गडचिरोली दि. २४/०७/२०१७

८ नोव्हेंबर २०१६ रोजी जुन्या ५००/१००० च्या चलनी नोटा चलनातून मागे घेतल्यानंतर एटापल्ली तालुक्यातील बुर्गीचा निवासी असणाऱ्या परशुराम बाजीराव डोंगरे नावाच्या व्यक्तीचा आर्थीक व्यवहार संशयास्पद असल्याची गोपनिय माहिती पोलीस विभागाला प्राप्त झाली होती. संबंधीत माहितीची पडताळणी केली असता त्यामध्ये नोटबंदी नंतर १ कोटी २० लाखापेक्षाचे संशयास्पसद व्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी आढळल्याने त्याबाबतची माहिती गृहविभाग केंद्रशासन व आयकर विभागाला कळविण्यात आली होती. परशुराम डोंगरे यांचे आलापल्ली येथे बँक ऑफ महाराष्ट्र मधील खाते ही तात्पुरते गोठविण्यात आले होते. आयकर विभागाने केलेल्या चौकशीत परशुराम डोंगरे यांचे आर्थिक व्यवहार संशयास्पद असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसा प्राथमिक अहवाल गडचिरोली पोलीसांना प्राप्त झाल्याने आयकर विभागाकडे परशुराम डोंगरे यांनी सादर केलेली कागदपत्रे पोलीस विभागाने तपासली. त्यामध्ये खोटे व बनावट दस्ताऐवज बनवून शासनाची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीविरुध्द दिनांक २३/०७/२०१७ रोजी पोस्टे अहेरी येथे कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ भा.द.वी. अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीस अहेरी न्यायालयामध्ये हजर केले असता न्यायालयाव्दारे आरोपीस ४ दिवसांची

ाोलीस कोठडी देण्यात आली आहे. गुन्हयाचा अधिक तपास पोनि. सुरेश मदने करीत आहेत.

_